# अर्थ प्रशासन विभाग
# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

---

जाक्रं/अप्रवि/अंसेनियो/ ६८० /२०१८ दिनांक: १० / ८ /२०१८

**स्मरण पत्र क्रं. ३**

**कालमर्यादा/अत्यंत महत्त्वाचे**

## परिपत्रक

संदर्भः—1) शासन निर्णय क्रं. वित्त विभाग, अंनियो—2012/प्र.क्रं.96/सेवा 4/दि. 21/08/2014
2)शासन निर्णय क्रं. वित्त विभाग, अंनियो—2015/प्र.क्रं.32/सेवा 4/दि. 06/04/2015
3)N.S.D.L. e-Governance Infrastructure Limited, N.S.D.L. C.R.A. /PO&RI/FC /2018/003 Dated 25.06.2018
4)या कार्यालयाचे परिपत्रक क्रं. अप्रवि/अंसेनियो/398/2018 दि. 29/06/2018
5)या कार्यालयाचे परिपत्रक क्रं. अप्रवि/अंसेनियो/489/2018 दि. 10/07/2018
6)या कार्यालयाचे परिपत्रक क्रं. अप्रवि/अंसेनियो/588/2018 दि. 24/07/2018

संदर्भ क्रं. 1 येथे नमुद शासन निर्णयानुसार राज्य शासनाने कृषि विद्यापीठे व विद्यापीठाशी संलग्न असलेल्या शासन मान्य अनुदानित कृषि महाविद्यालये व कृषि शाळा यांच्या सेवेत दि. 1 नोव्हेंबर, 2005 रोजी किंवा त्यानंतर नियुक्त झालेल्या/होणा—या कर्मचा—यांसाठी केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेत (NPS) सामील होण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

संदर्भ क्रं. 2 मध्ये नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना केंद्राच्या राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेत समाविष्ट होण्यासंदर्भात स्पष्टीकरण व संबंधित विभागांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत माहिती देण्यात आली होती. तसेच राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेअंतर्गत सर्व अधिकारी/कर्मचारी यांना कायम निवृत्ती वेतन लेखा क्रमांक देण्याची जबाबदारी केंद्रीय अभिलेख देखभाल अभिकरण यांना देण्यात आली आहे.

संदर्भ क्रं. 3 नुसार P.F.R.D.A. (Pension Fund Regulatory and Development Authority) ने राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेचे New C.S.R.F. Version 1.2 या अद्ययावत आवृत्तीमध्ये माहिती भरण्याचे निर्देशित केले आहे. या कार्यालयाने संदर्भ क्रं. 4, 5, व 6 च्या परिपत्रकाद्वारे सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांना विहीत नमुन्यात माहिती दिलेल्या मुदतीपर्यंत सादर करण्याचे सुचित केले होते. परंतु ब—याच कार्यालयांकडून विहित नमुन्यात माहिती या कार्यालयास अप्राप्त आहे. तसेच असेही निदर्शनास आले आहे की, या कार्यालयास प्राप्त होणारे विहित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेचे **New C.S.R.F. Version 1.2 Forms काळी शाईऐवजी निळया शाईच्या पेनाने भरून पाठवितात** व सदर Forms सोबत **पॅन कार्ड, आधार कार्ड, व बॅंक पासबुक इत्यादींच्या झेरॉक्स प्रतिंवर संबंधित कर्मचा—यांकडून सांक्षाकीत न करता** या कार्यालयास सादर करतात.

करीता संबंधित आहरण व संवितरण अधिकारी यांना पुन्हा सुचित करण्यात येते की, दिलेल्या सुचनांचे पालन करून आपल्या आस्थापनेवरिल कार्यरत असलेल्या नविन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजनेचे सभासद असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची माहिती दिलेल्या सुचनेप्रमाणे विहित नमुन्यात **(National Pension System (NPS) Subscriber Registration Form)** भरून 02 प्रतिंत या कार्यालयास दिनांक 18 ऑगस्ट, 2018 पर्यंत सादर करावे. सदर प्रकरणाची पुर्तता प्रथम प्राधान्याने करण्यात यावी. अन्यथा संबंधित प्रकरणी उद्भवणा–या कोणत्याही अडचणीस संबंधित आहरण व संवितरण अधिकारी जबाबदार राहतील याची कृपया नोंद घ्यावी.

नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.

प्रतिलीपीः–
1. नियंत्रक अधिकारी/विभाग प्रमुख/आहरण व संवितरण अधिकारी (सर्व)
2. मा. कुलगरूंचे तांत्रिक सचिव, डॉ. पंदेकृवि, अकोला यांना मा. कुलगुरूंचे माहितीकरिता सादर

स्वा–
नियंत्रक,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,
अकोला.